PUNE RESEARCH TIMES ISSN 2456-0960
AN INTERNATIONAL JOURNAL OF CONTEMPORARY STUDIES VOL 7, ISSUE 2

# संत तुकारामांचे व्यक्तित्व आणि कवित्व

**श्री. एकनाथ भिमराव पाटील**
पीएच. डी. रिसर्च स्कॉलर,
ओ. पी. जे. एस. विश्वविदयालय, चुरु,
**राजस्थान भारत**

## प्रस्तावना:

संत तुकाराम हे १७ व्या शतकातील एक संत होते. वारकरी संप्रदायातील सर्वजन त्याला जगद्‌गुरु या नावाने ओळखतात. विठ्ठल हे संत तुकारामांचे आराध्य दैवत होते. 'विष्णूमय जग वैष्णवांचा धर्म । भेदाभेद भ्रम अमंगळ ॥' असे काव्य करुन संत तुकारामांनी सतराव्या शतकात संमता व ऐक्य भाव प्रस्तापित करण्याचा प्रयत्न केला. संत तुकाराम हे निर्भिड, बंडखोर वृत्तीचे कवी होते. विशिष्ट वर्गाचे पारंपारिक मक्तेदारी असलेला वेदान्त हा संत तुकारामांनी आपल्या अभंगवाणीच्या माध्यमातून सर्व लोकांपर्यंत पोहचविला. या कार्यात त्यांना अनेक अडचणी आल्या पण ते डगमगले नाहीत. मराठीतील पहिले आधुनिक कवी म्हणून तुकारामांचा उल्लेख करावा लागतो. ते पाखंडी, अन्यायी, अभक्त, पापी, अंधश्रध्दा अशा वाईट प्रवृत्तीवर कठोर प्रहार करणारे परखड कवी होते. त्यामुळे ते तत्वचिंतक आणि थोर लोक कवी आहेत. नम्रता, लीनता आणि करुणा यांचे ठायीठायी दर्शन आपल्याला त्यांच्या अभंगातून होते. म्हणून त्यांचे व्यक्तित्व आणि कवित्व हे एकसमान आहे, असे समजता येते. संत तुकारामांच्या अभंगातील प्रतिमासृष्टी व उपमानसृष्टी ही पुर्णपणे संपन्न आहे. संत ज्ञानेश्वरांपासून ते संत एकनाथापर्यंत या संत कवींनीं अभंग हा काव्याचा प्रकार लोकप्रिय केला असला तरी तुकारामांच्या लेखनीने अभंग या काव्याप्रकाराचे सोने केले आहे. समाजातील कोणताही माणसाचे मोठेपण अथवा श्रेष्ठत्व हे त्या व्यक्तिची चित्तशुध्दी व प्रेमळ वर्तन

यावरुन ठरते असे ठामपणे तुकारामांनी त्यावेळच्या धर्ममार्तंडाना ठणकावून सांगितले. संत तुकारामांची कविता त्यांच्या कवीतेतील चिंतनशीलता, कवीतेतील भाषा, कवीतेची प्रतिमासृष्टी, याचबरोबर संत तुकारामांचा भक्तीयोग या विलक्षण आहे. तुकारामांनी आपल्या अभंगातून मनुष्याच्या सर्वस्पर्शी भावनांना वाच्या फोडली आहे. म्हणूनच संत तुकारामांच्या अभंगातील त्यांची प्रखड भूमिका ही बोधाची व शोधाची आहे. त्यांचे चिंतन हे एक जीवनमंथन आहे. म्हणूनच संत तुकाराम हे त्या काळातील एक श्रेष्ठ कवी होतेच पण वर्तमान काळातील सुध्दा एक श्रेष्ठ कवी नक्किच ठरतात. तुकारामांनी आपल्या अभंगात मानवी जीवनाचे खरी मुल्ये ठामपणे मांडली आहेत. संत तुकारामांची अभंगवाणी ही पंचमवेद म्हणून ओळखताना ती वेदापेक्षाही श्रेष्ठ आहे, कारण वेदात सुध्दा तीन वर्णांचाच विचार करण्यात आला आहे. संत तुकारामांच्या अभंगावाणीत जगातील मानव जातीच्या कल्याणाची काळजी आहे त्यामुळे संत तुकारामांचे अभंग अजरामर ठेवा आहे.

**संत तुकाराम : जीवनालेख .**

सतराव्या शतकातील वारकरी संप्रदायाच्या मध्ययुगीन संत मालिकेतील संत तुकाराम हे अखरेचे संत आहेत. आळंदीजवळ असलेल्या इंद्रायणीकाठच्या देहूक्षेत्रातील कुटूंबात त्यांचा जन्म झाला. त्यांच्या घराण्यात विठ्ठलाची पुजा व उपासना करण्याची परंपरा चालत आलेली होती. तुकारामांचे आडनाव अंबिले आहे व घराणे मोरे आहे. मोरे घराण्याचे मूळ पुरुष विश्वंभरबुवा हे विठ्ठलाचे भक्त होते. संत तुकारामांच्या जन्मवर्षाबद्दल अनेक वादविवाद आहेत. त्यात प्रा.द.वा. पटवर्धन यांनी त्यांचा जन्म शके १५२८ या साली झाल्याचे म्हटले आहे. डॉ. शं.दा. पेंडसे, डॉ. शंकर अभ्यंकर, डॉ. निर्मलकुमार फडकुले, प्रा. भालचंद्र नेमाडे, मुकूंद दातार यासारख्या अनेकांनी संत तुकारामांचा जन्म १५३० असा मानला आहे. प्रा.ल.रा. नसिराबादकर यांनी जन्म शके १५२० मानले आहे. तुकारामांच्या वडीलांचे नाव बोल्होबा तर आईचे नांव कनकाई होते. असे म्हटले जाते की, तुकारामांचे दोन विवाह झाले. पहिला विवाह वयाच्या १३ व्या वर्षी झाला. त्यांच्या पहिल्या पत्नीचे नाव रखुमाबाई होते. त्यांच्या पहिल्या पत्नीला दम्याचा त्रास होत असल्याने पुणे येथील सावकार अप्पाजी गुळवे यांची कन्या जिजाई उर्फ आवली हिच्यासोबत तुकारामांचा दुसरा विवाह झाला. तुकाराम १७ वर्षाचे असताना त्यांच्या आईवडिलांचे निधन झाले तेव्हा संपूर्ण घराची जबाबदारी तुकारामांना स्विकारावी लागली.

काळानुरुप पुढे जात असताना इ.स. १६२८ मध्ये संपूर्ण महाराष्ट्रात मोठा दुष्काळ पडला होता. पशूपक्षी , गुरेढोरे, अन्नाअभावी माणसे भूकेने मरण पावली. त्यातच तुकारामांची पहिली पत्नी रखुमाबाई व मोठा मुलगा मृत्यू पावले. या घटनेचा तुकारामांच्या मनावर खूप मोठा आघात झाला. अपमान, गरिबी यामुळे त्यांच्या मनात एक असुरक्षिततेची भावना निर्माण झाली ते दु:खी व उदासीन होऊन प्रपंच आणि व्यवसायाकडे दुर्लक्ष करु लागले अखेर ते प्रपंचाकडून परमार्थाकडे वळले.

संत तुकाराम साधारण २१-२२ वर्षाचे असताना त्यांच्या जीवनाची दिशा बदलली. घराण्यातील वाटण्या झाल्यावर एक वाटा त्यांनी धाकटया भावाला दिला व स्वत:च्या वाटणीची सर्व कर्जखते इंद्रायणी नदीत बुडवून टाकली. उरलेल्या द्रव्यातून विश्वंभरबुवानी बांधलेल्या विठ्ठलाच्या मंदिराचा जिर्णोध्दार केला. पुढे तुकारामांवरील कर्जाचा डोंगर वाढत गेला. कर्जदार घरी येऊ लागल्याने घरातील वातावरण अशांत होऊ लागले. यातून त्यांनी विरक्तवृत्तीने अखेर गृहत्याग केला व देहू जवळ असलेल्या डोंगरावर पारमार्थिक चिंतनासाठी प्रयाण केले. या डोंगरावर त्यांनी संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ यांचे वचने अभ्यासली व त्यांची पारायणे केली. विठ्ठलाचे चिंतन केले. नंतर ते गावागावात जाऊन भजन किर्तन करु लागले. बाबाजी चैतन्य यांना तुकारामांचे अनेक अभ्यासक गुरु मानतात. परंतू अनेक विचारवंताच्या मतानुसार संत तुकारामांनी साक्षात विठ्ठलालाच आपले गुरु मानले होते. तुकारामांचे अभंग व किर्तन लोकांना आवडू लागल्याने देहू परिसरातील वाईट लोक तुकारामांचा द्वेष करु लागले. हे प्रकरण न्यायालयापर्यंत सुध्दा गेले. यामुळे तुकारामांच्या अभंगवाणीच्या वहया त्यांना स्वत:ला इंद्रायणीच्या डोहात बुडवाव्या लागल्या. या प्रसंगी अन्नपाण्याचा त्याग करुन १३ दिवस तुकारामांनी इंद्रायणीच्या काठावर निर्वाण मांडले होते. परंतू या त्यांच्या अभंगवाणीच्या वहया लोकांनी तारल्या. 'अणुरेणुया थोडका । तुका आकाशाएवढा।' त्यांना आत्मसाक्षात्कार झाला. आणि शके १५७३ रोजी संत तुकारामांनी जगाचा निरोप घेतला.

**संत तुकारामांची अभंगरुपी कविता :**

संत तुकारामांची अभंगवाणी व त्यांचे व्यक्तीमत्व हे वज्रापेक्षा कठिण व मेणाहून मऊ आहे. तुकारामांच्या आत्माविष्काराचे प्रभावी माध्यम म्हणजे त्यांचे अभंगवाणी होय.

तुकारामांच्या अभंगवाणीने मराठी भाषेला अधिक उच्च पदावर नेताना श्रीमंत केले आहे. ते साधारणत: १६ - १७ वर्ष अखंडपणे अभंगरचना करीत होते. याकाळात त्यांनी साडेचार हजारापेक्षाही जास्त अभंगरचनांचे लेखन केले आहे. तुकारामांची कविता ही साधूचा, वैष्णवांचा गौरव करते. तसेच दुर्जनांचा, दांभिकांचा धिक्कारही करते. त्यांची कविता ही उपदेशपर कविता ही आहे. त्यांच्या कवितेतील अनुभव विश्व अधिक व्यापक आहे, कारण प्रत्यक्ष विठ्ठल हाच त्यांचा गुरु व देव होता. या कारणानेच विठ्ठल हाच तुकारामांचा मुळस्त्रोत आहे.

संत तुकारामांच्या काव्यात भक्तीची प्रेरणा आहे. त्यांच्या भक्तीमध्ये तीव्रता, आकर्षण व ओढ दिसून येते. तुकारामांनी आपल्या काव्यातून नीतीधर्माचा प्रचार आणि प्रसार केला. पोपटपंची करीत किर्तन, प्रवचन करणाऱ्यांवरही टिका केली. संत तुकारामांची अभंगवाणी ही त्यांच्या व्यक्तिमत्वाचा एक मुक्त अविष्कार आहे. त्यांच्या काव्याची अनेक बलस्थाने असून त्यात प्रामुख्याने सुभाषितमयता,आत्मप्रकटीकरण, भावकविता, जीवनचिंतन, प्रतिमासृष्टी, अफाट अनुभव विश्व यांचा विचार करावा लागलो. बालक्रीडेचे अभंग, प्रासंगिक अभंग, भक्तीविषयक अभंग, समाजप्रबोधन विषयक अभंग, उपदेशपर अभंग, आत्मचरित्रपर अभंग अशी विविधता त्यांच्या अभंगवाणीत दिसून येते. याच्यातून त्यांची अभंगरुपी कविता अधिक व्यापक आहे हे कळते.

**तुकारामांच्या काव्याची भाषा :**

संत तुकारामांच्या काव्याची भाषा मऊ, कोमल तर कधी कधी बंड करणारी आहे. त्यांची कविता ही माणसांचे हृदय खुले करणारे आहे. काव्याच्या भाषेत संवादी, आशय घनता, अवतरणक्षमता, प्रतिमासृष्टी, नादमयता, अलंकारीकता, ओतपोत भरलेली आहे. तुकारामांची कविता ही केवळ एकाच व्यक्तीशी संवाद करीत नसून ती बहुसंवादी आहे. 'उपमेय असो वा उपमान असो, त्याचे आपल्या व्यक्तीमत्वाच्या द्वंदातील मार्गाने सत्य शोधून काढणे, हेच तुकारामांच्या कवितेचे कार्य असल्याने त्यांच्या कवितेत नानविध सत्यरुपे सतत ये-जा करित असतात. आणि म्हणूनच त्यांची कविता साकल्याने, विभागश: व घटकश: अवतरणक्षम होऊ शकते.' [१] नादमयता हा तुकारामांच्या कवितेचा प्रमुख कणा आहे. त्यांनी आपल्या अभंगवाणीने लोभी, ढोंगी यांच्यावर कठोर प्रहार केले. वा.ल. कुलकर्णी यांनी 'तुकारामांची वाणी ही अस्सल मराठामोळी आहे, ती शिष्टांची भाषा नाही, ती आपले सर्व सामर्थ्य लोकभाषेतून घेते' असे

म्हटले आहे. तुकारामांचे अभंग म्हणजे एक प्रकारे लोकभाषाच असून ती भाषा प्रासादिक आहे. 'हि वाणी म्हणजे तुकारामांच्या व्यक्तित्वाचा विमुक्त अविष्कार आहे. तुकारामांची अभिव्यक्ती ही नेहमीच दिलखुलास असते. तिच्यात एक प्रकारचा बेधूंद विमुक्तपणा असतो. खुरटेपणा तिला ठाऊक नाही. भरघोसपणा हे तिचे वैशिष्टय आहे. तिच्यातून व्यक्त होणारे भावानुभव हे ही रससरलेले असतात. त्यात एकप्रकारची सजीवता व सामर्थ्य असते.' [२]

**तुकारामांची काव्यप्रतिमासृष्टी :**

तुकारामांची कविता ही वैश्विक आहे. त्यांच्या काव्याची प्रतिमासृष्टी ही अभिजात आहे. परिणामकारकता, नवेदर्शन, नवनिर्मिती, ताजेपणा, अल्पाक्षरत्व अशी काही त्यांच्या प्रतिमासृष्टीची वैशिष्टये आहेत. त्यांच्या काव्यात वैविध्य आणि विपूलता आहे. तुकारामांच्या कवितेतील प्रतिमा चिरंतन आहेत. 'तुकारामांचे उत्कट भावजीवन अतिशय सार्थपणे व समर्थपणे ही प्रतिमाने वाचक-श्रोत्यासमोर उभे करतात. तुकारामाची काव्यशक्ती कशी अव्वल दर्जाची होती व कवी याद्दष्टीने तुकारामांचे स्थान किती श्रेष्ठ दर्जाचे होते याचे सुंदर दिग्दर्शन त्यांची प्रतिमानसृष्टी करते.'[3]

**तुकारामांची चिंतनशीलता :**

संत तुकारामांचे चिंतन हे त्यांच्या कवितेतून सखोल व सर्वव्यापक असल्याचे जाणवते. त्यांच्या अभंगातील सगुण-निर्गुण, द्वैत् - अद्वैत, माया,धर्म , बंधूभाव, अहिंसावाद याविषयीची त्यांची चिंतनशिलता प्राधान्याने प्रकट होते. ज्यांच्या अंगामध्ये दया, क्षमा, शांती आणि अहिंसा असते असा माणूस खऱ्या अर्थाने श्रेष्ठ असतो. तुकारामांनी पशूपक्ष्यांचे बळी दिल्या जाणाऱ्या देवांचा कडक शब्दात निषेध केला आहे. यावरुन त्यांचे नीतिशास्त्र रोकठोक असल्याचे कळते. 'तुकारामांच्या समाजिक चिंतनाला विवेकाचे अधिष्ठान आहे. त्यांच्या भक्तियोगात कर्तव्य विन्मुखता नाही. गतीशून्यता तर मुळीच नाही. प्रेयस आणि श्रेयस यातील फरक त्यांनी नीरक्षीरन्यायाने स्पष्ट केला आहे. अहिंसा, स्वावलंबन व चारित्र्यसंपन्नता यावर यांनी भर दिला आहे. षड्रिपू जिंकावेत, लोखंडाचे चणे खावेत, तेंव्हाच भ्रमपदी नाचता येते. तुकोबांचे सामाजिक दृष्टेपण केवळ अपूर्ण आहे.'[४]

**कवितेतील सामाजिकता :**

संत तुकारामांनी समाजातील चांगल्या वृत्तीचा गौरव करताना वाईट वृत्तीवर हल्ला चढविला. यातून त्यांच्या सामाजिकतेची कल्पना येते. तुकारामांनी संमतेच्या मुल्यांची पेरणी केली त्यांच्या कवीतेतील सामाजिकता ही सर्वोच्च आहे. समाजातील दांभिकतेला तुकारामाने कडाडून विरोध केला आहे. 'फुलासंगे मातीस वास लागे ।' यातून तुकारामांनी संताचा गौरव केला आहे. जगातील सर्वच वस्तू विष्णूमय आहेत, समान आहेत हाच खरा वैष्णव धर्म असल्याचे त्यांने आपल्या भक्ताना स्पष्ट सांगितले आहे. 'जे का रंजले गांजले । त्यासी म्हणे आपुले ॥' यातून तुकारामांनी रंजल्या गांजल्याशी प्रेमाने वागणारा साधू हा खरा परमेश्वरच असतो हे स्पष्ट केले आहे. सांसारिक माणसाना ताठ मानेने उभे करुन या माणसना सुसंस्कृत बनण्यासाठी आग्रह धरताना तुकारांमानी समाजातील वाईट प्रथांचे वस्त्रहरण केले.

**तुकारामांच्या कवितेचे वाङ्मयीन श्रेष्ठत्व :**

संत तुकाराम हे लोकशिक्षक होते. अभंगवाणीतून त्यांचे शब्द तीक्ष्ण असून तुकारामांचे अभंग भावगीत आहेत. त्यांनी आपल्या काव्यात जीवनाची शाश्वतमुल्ये मांडली आहेत. त्यामुळेच ते तत्कालीन समाज जीवनाचे श्रेष्ठ भाष्यकार आहेत. तुकारामांची निष्काम भक्ती भावनेवर श्रध्दा असून त्यांनी सगून भक्तीचा पुरस्कार केला आहे. माणसाने नम्र आणि क्षमाशील असावे हे ठणकावून सांगितले आहे. त्यांची उपमानसृष्टी व प्रतिमानसृष्टी संपन्न आहे. त्यांच्या कवितेमध्ये मानवी जीवनाचा करुणामय अविष्कार आहे. म्हणूनच तुकारामांची पुर्ण अभंगवाणीही भक्तीच्या प्रवाहाने ओथंबलेली आहे.

**निष्कर्ष**

- संसारातील अनेक अडचणीने विठ्ठलाशी आपली भेट होत नाही, यामुळेच संत तुकाराम सांसारिक वैराग्य घेवून भक्ती मार्गाकडे वळले.
- तुकारामांच्या अभंगवाणीचा जीव म्हणजे तिच्यात असलेली प्रबळ आत्मनिष्ठा होय.
- संत तुकारामांची कविता ही भावकविता व उपदेशपर कविता असून समृध्द व व्यापक आहे.

- तुकाराम हे चांगल्या आचरणावर भर देणारे संत कवी होते, म्हणून त्यांच्या काव्यात आत्ममंथन, करुणा, क्षमा, शांती यासारख्या अनेक खऱ्या मुल्यांचे दर्शन होते.
- संत तुकारामांच्या कवितांची व्याप्ती लक्षणीय असून त्यात विविधता आहे. तुकारामांची प्रतिमासृष्टी ही पारंपारिक आणि व्यावहारिक असली तरी ती तत्कालीन संस्कृतीची द्योतक असून आत्मानुभूतीवर आधारलेली आहे.
- संत तुकारामांची कविता जशी आत्मनिवदेनपर आहे, तशीच ती समाजनिष्ठही आहे. त्यांच्या काव्याचा स्वत:चा नाद व ताल आहे. त्यांच्या अनेक उद्गारांना मराठीत सुभाषित व म्हणींचा दर्जा प्राप्त करुन दिला आहे.

## संदर्भग्रंथ

१. जाधव रा.ग., ‘आनंदाचा डोह’, प्राज्ञ पाठशाळा, वाई
२. कुलकर्णी वा.ल., ‘वाङ्मयीन टीप आणि टिपण्णी’, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई
३. डॉ. पाटील मालती., ‘तुकारामांची प्रतिमानसृष्टी व त्यांच्या काव्यात्मशक्तीचे मूल्यमापन’, नागपूर विदयापीठ प्रकाशन, नागपूर
४. दोडे अरविंद(संपा.), ‘तुकारामदर्शन’, सुदर्शन प्रकाशन, मुंबई